Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV | ISSUE-IV | APR. | 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# भारतातील महिलांवरील होणाऱ्या घरगुती हिंसाचाराचे स्वरूप

पांडूरंग श्रीरंगराव मुंजाळ
संशोधनार्थी
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

संयुक्त राष्ट्रसंघटनेतील लोकसंख्या कोश विभागाच्या अहवाला नुसार भारतात १५ ते ४९ या वयोगटातील ७० टक्के महिला कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या घरगुती हिंसाचाराच्या शिकार झालेल्या असतात. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवाला नुसार २००४ मध्ये घरगुती हिंसाचाराच्या ५५४३९ तक्रारी दाखल झल्या होत्या. २००३ मध्ये त्याची संख्या ५०७०३ एवढी होती. पती आणि सासरच्या नातेवाईक मंडळींनी केलेल्या घरगुती हिंसाचारामध्ये २००६ या वर्षात ९.३ टक्यांनी वाढ झाल्याचे आढळून येते.

महिलांवरील अत्याचाराच्या गुन्हयासंबंधीची सांख्यिकिय माहिती भारत सरकारच्या गृह मंत्रालयाव्दारे दर वर्षी प्रकाशित केली जाते. या माहितीच्या अधारे १९९१ पासून २००५ पर्यतच्या कालावधीत महिलांवर केल्या जाणाऱ्या अत्याचाराच्या गुन्हामध्ये ६७ टक्यांनी वाढ झालेली आहे. या कालावधीतील हुंडा बळींच्या संख्येत ३४ टक्यांनी वाढ झलेली आहे. भारतात दररोज ३३ म्हणजे एका वर्षात १२००० महिलांच्या हत्या हया हुडयाशी निगडीत असतात. असे म्हटले जाते. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा गिरिजा व्यास यांनी ३७ टक्के भारतीय महिला घरगुती हिंसाचाराच्या शिकार ठरतात असे मान्य केले आहे. परंतु स्त्रीवादी संघटना आणि अभ्यासकांच्या मते ५० ते ७० टक्के महिला घरगुती हिंसाचाराच्या शिकार होत असतात.

घरगुती हिंसाचाराच्या घटनांशी संबंधित गुन्हयामध्ये घट होत असल्याचे कोणत्याही आकडेवारीवरून स्पष्ट होत नाही, ही सर्वांनीच चिंता करण्याची बाब आहे. दूसरे म्हणजे घरगुती हिंसाचाराच्या संदर्भात नोदवल्या जाणाऱ्या तक्रारी आणि प्रत्यक्षात घडणाऱ्या घटनांची संख्या कितीतरी पटीने अधिक असते. कारण घरातला हिंसाचार हा चव्हाटयावर आणू नये म्हणून मुकाटयाने सहन करणाऱ्या महिलांची संख्या फार मोठी आहे. अनेक शताकापासून हीच स्थिती सुरू आहे हे दर्शवणाऱ्या म्हणी व वाक्प्रचार मराठी भाषेत रूढ आहेत. जसे पावसानं झोडपलं अन् नवऱ्यान मारलं तर तक्रार कोणाकड करावी. नवरा बायकोच्या भांडणात ब्रम्हदेवानेही पडू नये.

महिलांचा पदोपदी होणारा आपमाण, त्यांनी केलेल्या कोणत्याही कामाचे जाणूनबूजून चीज न करणे, त्यांना कोणत्याही प्रकारच्या विकासाच्या आणि मनोरंजनाच्या संधी मिळू न देणे हे सर्व कुटूंबात घडणाऱ्या मानसिक हिंसाचाराचे विविध पैलू आहेत. शारीरिक हिंसेच्या प्रकारावरून आपल्याला घरगुती हिंसाचाराच्या शिकार झालेल्या महिलांचे स्वरूप लक्षात येईल.

**साररी व माहेरी होणारी मारहाण :**

भारतीय समाजाच्या सर्व स्तरात म्हणजे गरीब, मध्यम व श्रीमंत अशा तिनही वर्गात पत्नीला मारहान करणे ही एक प्रचलीत बाब आहे. आपल्या पत्नीला मारहाण करणे हा आपला विशेष अधिकार आहे. असे पुरूष वर्ग मानतो. अनेक प्रगत वा विकसित देशामध्येही हीच परिस्थिती आहे. विवाह होण्यापूर्वी उध्दटपणा, परपुरूषांशी बोलने, घरी उशीरा येणे यासारख्या कारणांसाठी म्हणजे वळण निट नसल्याच्या करणांसाठी माहेरी सुध्दा स्त्रीला मारहाणीला तोंड दयावे लागते. माहेरी होणाऱ्या मारहाणी पेक्षा सासरी होणारी मारहाण ही अधिक व्यापक व तीव्र स्वरूपाची असते. स्वयंपाक बिघडणे, अन्य पुरूषाशी संबंध असल्याचा संशय, लैंगिक संबंधाना नकार देणे, घराबाहेर झालेल्या अपमाणाचा राग काढणे, पैसे किंवा इस्टेटीमधील वाटा देण्याचा नकार या सारखी अनेक कारणां मुळे पत्नीला मारहाण करण्याचा विशेष अधिकार पतीवर्ग गाजवत असतो. पत्नीला मारणे ही बाब तर सर्वत्रच आढळते. पुरूषत्व सिध्द करण्यासाठी किंवा आपल्या वैफल्याचा राग काढण्यासाठी महिलांना मारहाण केली जाते.

**गर्भ हत्या व बालीका हत्या :**

गर्भजल परिक्षणाचा उपयोग वैद्याकिय कारणांसाठी न करता त्याचा गर्भलिंग परिक्षणासाठी दुरूपयोग केला जातो. गर्भ हा मुलींचा असल्यास ताबडतोब गर्भपात केला जातो. दरवर्षी लाखो बालीकांचा जन्म होण्यापूर्वीच त्यांना मारून टाकले जाते.

मुलीला जन्मा नंतर लगेचच त्यांना मारून टाकण्याची आघोरी प्रथा १९साव्या शतकात राजस्थान व गुजरातमधील काही विशिष्ट जाती व जमातीमध्ये प्रचलीत होती. ब्रिटीशांनी १८७० मध्ये स्त्री अर्भकहत्येच्या प्रथेला पायबंद बसावा म्हणून कायदा केला. १८व्या शतकात उत्तर व दक्षिण भारतातील मध्यम जातीमध्ये मुलींना जन्मात:च मारून टाकण्याची प्रथा होती. त्यासाठी नवजात बालीकेला दुधाच्या भांडयात बुडविणे, खाटेच्या पायाखाली चिरडणे, विषारी फळांचा रस पाजणे अशा क्रुर पध्दतीचा अवलंब केला जात असे. आजही प्रथा बऱ्याच प्रमाणात नष्ट झाली आहे परंतू बदलत्या काळाच्या प्रवाहातही अशा पध्दतीची कुप्रथा कमी प्रमाणात टिकून राहीली. राजस्थान मधील काही ग्रामीण भागात राजपूत व तामिळनाडूतील कल्लार जातीमध्ये ही आघोरी प्रथा असल्याचे आढळून येते. कारण कल्लार जातीतील १० वर्षाखलील बालकांमध्ये मुलींचे प्रमाण फक्त ३० टक्के आहे. मुलींना मोठे करणे व हुडा देवून तिचे लगन करणे परवडण्याजोगे नाही असे या गरीब व निरक्षरतेने ग्रस्त असलेल्या जातीत मानले जाते.

**आत्महत्या :**

कुटूंबांतर्गत हिंसाचाराची शिकार झालेल्या महिलेला आपल्यासाठी सर्व मार्ग बंद झालेले आहेत असे वाटते. त्यामुळे काही विवाहीत महिला सासरच्या असहय जाचाला कंटाळून आत्महत्येचा मार्ग निवडतात. तसेच काही कुटूंबामध्ये जाचाजी तीव्रता वाढवून आत्महत्येचा मार्ग स्विकारण्यासाठीचे वातावरण तयार केले जाते. विवाहासाठी दयाव्या लागणारा हुंडयाचा भार आपल्या गरीब आई-वडिलावर पडू नये या कारणासाठी अनेक तरूणींने आत्महत्या केल्याची काही उदाहरणे घडली आहेत.

**हुडाबळी :**

विवाहातील हुंडयाच्या नावावर सासरच्या मंडळी नी केलेला छळ, खुन, मारहाण, घरातुन बाहेर काढणे, अवघड कामे करावयास लावणे, मानसिक छळ आदी कारणांच्या मुळाशी हुडा हेच कारण असते. नवविवाहीत तरूणीला झालेला अपघात अथवा तिने केलेली आत्महत्या असा रंग त्याला दिला जातो.

**लहान वयातील मुलींरील लैंगिक छळ :**

कौटूंबिक हिंसाचाराचा हा सर्वात घृणास्पद प्रकार समजला जातो. कारण लहान वयातील मुलींवर कुटूंबाकडून, नातेवाईक आणि घरातील नोकर चाकर मंडळी या तीन पेकीच कोणाकडूनही केले जातात. मुली या प्रसंगाची वाच्यता करत नाहीत कारण अत्याचारीत व्यक्तीने त्यांच्या मनात दहशत निर्माण केलेली असते. तर काही वेळा आपल्या मुलींच्या चारित्र्याला कलंक लागू नये या उद्देशाने आई-वडिलांकडून ती गोष्ट लपवून ठेवली जाते. त्यामुळे अत्याचारी हे मोकाट राहतात. लहान वयातील मुलींवर याचे अत्येत दुरगामी परिणाम होतात तसेच त्या मनाने खचून जातात.

अशा प्रकारे भारतातील महिलांवर होणाऱ्या घरगुती हिंसाचाराच्या स्वरूपाचा उलगडा वरील आशयातून प्रतयास येतो.

**संदर्भ ग्रंथ**

१. ए.आर.देसाई, भारतीय ग्रामिण समाजशास्त्र, जयपुर, रावत पब्लिकेशन, सन १९९७
२. आहुजा राम, सामाजिक समस्याएँ, जयपुर, रावत पब्लिकेशन, सन २०००
३. रा.ज. लोटे, भारतीय समाज आव्हाने आणि समस्या, पिंपळापुरे प्रकाशन, नागपुर, सन२०१५
४. डॉ. स्मीता मेहत्रे, २०११, भारतीय स्त्री आणि मानवाधिकार, श्री. साईनाथ, प्रकाशन, नागपूर